Maharashtra State
Secondary and Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board,
Kolhapur - 416004

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६००४

Phones : Chairman - 2690829 Secretary - 2691405 PBX-2696101,2696102,2696103 FAX:[0231]2690758 E-Mail: divsec.kop@gmail.com Web : sscboardkolhapur.in

क्र.को.वि.मं./उच्च माध्य परीक्षा/ 2556
कोल्हापूर- ४१६००४.
दिनांक : १५ / १२/२०२२

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय / माध्यमिक शाळा,
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

**विषय:- शास्त्रीय कला, (गायन, वादन, नृत्य), चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या तसेच खेळाडू, एन.सी.सी., स्काऊट व गाईड विद्यार्थ्यांच्या प्रस्तावांना छाननी शुल्क फेब्रुवारी-मार्च 2023 परीक्षेपासून आकारणी करणेबाबत..**

**संदर्भ:- 1.क्र.रा.मं./परीक्षा-7/6487 दि.28/11/2022 रोजीचे पत्र.**
**2. क्र.रा.मं./परीक्षा -7/6711 दि.12/12/2022 रोजीचे पत्र.**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.10 वी) शास्त्रीय कला, (गायन, वादन, नृत्य), चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला तसेच खेळाडू, एन.सी.सी., स्काऊट व गाईड प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12 वी) खेळाडू विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यासाठीचे प्रस्ताव शाळा व कनिष्ठ महाविद्यालय तसेच शिक्षणाधिकारी/ जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांकडून या कार्यालयास प्राप्त होतात.

तरी, संदर्भ क्रमांक-1 वरील पत्रानुसार फेब्रुवारी-मार्च 2023 परीक्षेपासून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.10 वी) शास्त्रीय कला, (गायन, वादन, नृत्य), चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला तसेच खेळाडू, एन.सी.सी., स्काऊट व गाईड प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12 वी) खेळाडू विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरीक्त गुण देण्यासाठीचे प्रस्ताव मंडळ कार्यालयात सादर करत असतानाच प्रती विद्यार्थी रु.50/- (रु.पन्नास फक्त) छाननी शुल्क आकारण्याबाबत परिपत्रकाव्दारे कळविण्यात आले होते.

तथापि संदर्भ क्रमांक-2 वरील राज्य मंडळ पत्रानुसार सदर परिपत्रकामध्ये बदल झालेला असून **छाननी शुल्क प्रती विद्यार्थी रु.50/- ऐवजी रु.25/- (रु.पंचवीस फक्त)** असे आकारण्यात यावेत. सदरचे छाननी शुल्क चलनाव्दारे किंवा मंडळ कार्यालयात रोख रक्कम भरुनच प्रस्ताव स्विकारण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

**(डी.एस. पोवार)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**
1) शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.सातारा, सांगली, कोल्हापूर
2) जिल्हा क्रीडा अधिकारी, सातारा, सांगली, कोल्हापूर

Panwalkar/Circular